Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-12 | June-2014 Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# "रोजगार हमी योजना महाराष्ट्राने देशाला दिलेली सर्वात महत्वाची ग्राम विकास करणारी आदर्श अभिनव योजना"

*गणपतराव कलशेट्टी,*

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सी.बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स,राजा विजयसिंह कॉमर्स, ॲण्ड, राजा जयसिंह आर्टस कॉलेज,अक्कलकोट जि–सोलापूर .

**सारांश** - रोजगार हमी योजनेची सुरुवात भारतात सर्व प्रथम महाराष्ट्र राज्यानी केली. या योजनेस दुष्काळ निर्मुलन करणारी व मागेल त्याला कामाची हमी देणारी योजना म्हणून ओळखली जाते.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्यास सतत प्रचंड मोठया नैसर्गिक आपत्ती म्हणजे दुष्काळ व टंचाईग्रस्त परिस्थितीशी सामोरे जावे लागत असे. अशा वेळी राज्यातील ग्रामीण भागातील लोकांना रोजगार देवून ग्रामविकास घडवून आणणे शक्य होण्यासाठी. महाराष्ट्रातील थोर समाजसेवक विचारवंत स्व. वि. स. पागे यानी सांगली जिल्हयातील तासगांव औंदुबर या गावी रोजगार हमी योजना MODEL SCHEME म्हणून सन 1965 मध्ये सुरु केली. सुरुवातीस ही योजना प्रायोगिक तत्वावर REGION SCHEME म्हणून अंमलात आणली गेली. परंतु संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सन 1972 मध्ये रोहयोचे अंमल झाले. सन 1977 मध्ये ही योजना कायदयातून पारित करण्यात आली.

सुरुवातीस योजनेच्या विधेयक संमत होण्यासाठी स्व. वि. स. पागे यानी संपूर्ण विधानमंडळ सदस्यांसमोर प्रथम रोहयो बाबत स्वतःचे मत भावना मांडले, अत्यंत कळकळीने हे विधेयक पास करुन घेतले, तो दिवस, प्रसंग महाराष्ट्राच्या आर्थिक विभागात विशेष बाब म्हणून नोंदवली गेली आहे व सन 1977 त्यांनी एक महत्वाची इच्छा सर्वांसमोर प्रकट केली. ती इच्छा म्हणजे महाराष्ट्रातील ही योजना भारतातील प्रत्येक राज्यानी स्विकारतील व त्या दिशेने वाटचाल करुन ही योजना "STATE LIMIT NO NATION LIMIT GO" असे मत व्यक्त केले.

## रोजगार हमी योजना

1. रोजगार हमी योजना – 1972
2. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना – 2005
3. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना–2008

    1. E.G.S. – 1972

2. M.R.E.G.S. – 2005
3. MANAREGA – 2008.

### रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील फरक
### E.G.S. व MANAREGA

1. रोजगार हमी योजना राज्य सरकारची तर MANAREGA केंद्र सरकारची.
2. काम मागणाऱ्या मजूरांना कामाची नोंदणी अगोदर करणे आवश्यक.
3. 15 दिवसाच्या आत रोजगार देण्याची हमी अन्यथाः बेकार भत्ता देण्याची हमी
4. रोहयोत 365 दिवस कामाची हमी तर MANAREGA मध्ये 100 दिवस रोजगार हमी
5. मजूरांचे वय 18 ते 60 दरम्यान आवश्यक.
6. वेतन रोखीने किंवा 1/2 रोख 1/2 धान्य देण्याची तरतूद. परंतू MANAREGA मध्ये राष्ट्रीयकृत बॅंकेतून मजूरी देण्याची व्यवस्था मजूरी– प्रति मजूर प्रतिदिन 168 रु.
7. जॉब कार्ड देणे बंधनकारक
8. 5 किलो मीटर च्या आत काम देणे आवश्यक अन्यथः प्रवास भत्ता व वाढीव वेतन देण्याची तरतूद.
9. कामाच्या ठिकाणी आवश्यकत्या सर्व सोई उदा– पिण्याचे स्वच्छ पाणी, निवारा, दवाखाने, अन्नधान्य देणे, वेतन इत्यांदीची सोय.
10. राज्यात सा.बा. विभाग, वन विभाग, कषी विभाग, समाजिक वनीकरण विभाग, तहसील विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायत इत्यादींचा सक्रीय सहभागातून रोहयो अंमलबजावणी.
11. मूलभूत ग्राम विकास योजनेची कामे, रस्ते विकास इत्यादी कामांची आवश्यकता.
12. मजूरीवर 60 टक्के अधिक रक्कम खर्च करण्याची तरतूदी, जनसवर्धन कामाला अधिक महत्व, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी योजनेचे प्रमुख असतात.
13. मजूरांच्या श्रमशक्तीस अधिक महत्व यांत्रीक कामास विरोध योजनेचा मुख्य उद्‌देश

1. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार देणे.
2. योग्य वेतन व भत्याची हमी देणे.
3. ग्रामीण भागास आर्थिक व सामाजिक दृष्टीने भक्कम बनविणे.
4. लोकांची गरीबी व दारिद्रय दूर करणे.
5. ग्रामीण लोकांचा राहाणीमान उंचावणे.
6. ग्राम विकासाची शक्ती वाढविणे.
7. पायाभूत विकास कामाला प्राधान्य देणे.
8. ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर थांबविणे.
9. ग्रामीण भाग आर्थिक दृष्टया स्वावलंबन बनविणे.
10. ग्रामीण श्रमशक्तीचा पुरेपूर वापर करणे.
11. पर्यावरणीय संतूलन निर्माण करणे.

**रोजगार हमी योजना – महाराष्ट्र**
**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**

| अं.क्र. | जिल्हांची नावे | रस्तेकाम | अंदाजीत किंमत | तलाव कामे | अंदाजीत किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | सोलापूर | 171 | 863.78 | 272 | 1214.91 |
| 2 | नाशिक | 66 | 4627 | 201 | 1473.3 |
| 3. | नंदुरबार | 30 | 95.84 | 41 | 77.03 |
| 4. | चंद्रपूर | — | — | 02 | 22.96 |
| 5. | औरंगाबाद | 17 | 184.05 | — | — |
| 6. | बीड | 385 | 3.31529 | 1.362 | 8.548.5 |
| 7. | वाशीम | 34 | 19939 | 05 | 47.84 |
| 8. | गोंदीया | — | — | 43 | 753.54 |

संदर्भ :— 24/07/2010 चे. आदेश पत्र
महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना
मुंबई 400032

**महाराष्ट्र रोजगार हमी योजना – जि. सोलापूर**

| अं.क्र. | कामाचे स्वरुप | कामाचे प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सिंचन | रस्ते | कृषी | वनीकरण | इतर | एकूण |
| 1 | नियोजीत कामाची संख्या | | | | | | |
| 2 | मजूर केलेल्या कामाची संख्या | | 1019 | 2007 | 0 | 17027 | 20053 |
| 3 | सुरु केलेल्या कामाची संख्या | | 121 | 538 | 0 | 6927 | 7586 |
| 4 | पूर्ण केलेल्या कामाची संख्या | | 41 | 109 | 0 | 5139 | 5289 |
| 5 | मध्येच बंद केलेल्या कामाची संख्या | | 80 | 429 | 0 | 1788 | 2297 |
| 6 | कामासाठी केलेले तरतूद – लाखात | | | | | | 8000 |
| 7 | कामावर झालेला एकूण खर्च | | | | | | 7832 |
| 8 | रोजगार निर्मिती मनुष्य दिवस संख्या | | | | | | 27 |

संदर्भ :— जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011—12

**निष्कर्ष :–**

रोहयो व मग्रारोहमो मनरेगा हे देशाच्या विकासातील ग्रामीण विकास चळवळीचे प्रमुख घटक आहेत.

योजनेची व्याप्ती वाढली आहे. महत्व समजल्याने ग्रामीण बेकारी, दारिद्रय दूर होवून सामाजिक व आर्थिक जीवन सुखमय बनले. योजनेने ग्रामीण स्थलांतर थांबले व खेडे स्वयंपूर्ण बनत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या स्वप्नातील खरा भारत स्वयंपूर्ण खेडेगांव ही संकल्पना सत्यात उतरत आहे.

**संदर्भ :–**

1. लोकराज्य मे 2011 – **महाराष्ट्र शासन** 2011
2. **महाराष्ट्र** शासन लोकराज्य मे – 2012
3. सोलापूर जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन – 2011–12.
4. **महाराष्ट्र** शासन मुंबई रोहयो – 24/07/2010 पत्र